जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १७६ | शनिवार, १७ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिकेवर फुललं कमळ

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात आता भाजपची एंट्री

**पुणे, ता. १६ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीचा निकाल हा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेचा निकाल न राहता राज्याच्या राजकारणात मोठे संकेत देणारा ठरला आहे. राज्यातील २९ महापालिकांपैकी तब्बल २१ महापालिकांवर भाजपने आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. काँग्रेस राज्यातील दुसरा मोठा पक्ष ठरला असला, तरी अजित पवार गटाला एकाही महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा निकाल अजित पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.



महापालिका निवडणुकीची घोषणा झाल्यापासून अजित पवार पुणे जिल्ह्यात ठाण मांडून बसले होते. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिकांवर राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी त्यांनी सगळी ताकद पणाला लावली होती. यासाठी त्यांनी शरद पवार गटासोबतही युती केली होती. मात्र प्रत्यक्ष निकालात पुणेकरांनी वेगळाच कौल दिला.

पुणे महापालिकेच्या १६५ पैकी १५५ जागांचा निकाल लागला असून त्यामध्ये भाजपला थेट ११८ जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादीला केवळ १७ जागांवर समाधान मानावं लागलं, तर शरद पवार गटाला फक्त २ जागा मिळाल्या. काँग्रेसला १६ जागा मिळाल्या असल्या तरी सत्ता स्थापनेसाठी त्यांचा काहीही उपयोग होणार नाही. शिंदे गट आणि ठाकरे गट प्रत्येकी एका जागेवर अडकले आहेत.

दुसरीकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेतही भाजपने वर्चस्व सिद्ध केलं आहे. १२८ पैकी ८४ जागा भाजपने जिंकल्या असून राष्ट्रवादीला ३७ जागा मिळाल्या आहेत. शिंदे गटाला ६ जागा, तर इतर पक्ष जवळपास नामशेष झाले आहेत. दोन्ही महापालिकांमध्ये भाजपचे दोन प्रमुख चेहरे महेश लांडगे आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ अजित पवारांसाठी मोठे अडथळे ठरले.

प्रचारादरम्यान अजित पवारांनी महेश लांडगेंना खुले आव्हान दिलं होतं. नासका आंबा, भारंदाज डाव टाकून फिरवून फेकला नाही तर पवारांची औलाद नाही, अशा शब्दांत त्यांनी लांडगेंवर हल्ला चढवला होता. लांडगेंवर भ्रष्टाचाराचे आरोप करत मी ठरवलं तर एखाद्याचा कार्यक्रम करतो असाही इशारा दिला होता. त्यावर महेश लांडगेंनीही तितक्याच आक्रमक भाषेत प्रत्युत्तर देत अजित पवारांवर टीकास्त्र सोडलं होतं.

मुरलीधर मोहोळ यांच्या बाबतीतही चित्र वेगळं नव्हतं. मागील निवडणुकीत मोहोळांना हरवण्यासाठी अजित पवारांनी चंद्रकांत पाटलांशी हातमिळवणी केल्याचं राजकीय वर्तुळात बोललं जात होतं. मात्र यावेळी मोहोळांनी भाजपसाठी पुणे जिंकून दिलं.

या निवडणुकीत काही प्रभाग विशेष चर्चेत राहिले. प्रभाग क्रमांक २३ (क) मध्ये राष्ट्रवादीच्या लक्ष्मी आंदेकर यांनी भाजपच्या ऋतूजा गडाळे यांचा केवळ ८१ मतांनी पराभव केला. तर नाना पेठ आणि रविवार पेठ असलेल्या प्रभाग २३ (ब) मध्ये राष्ट्रवादीच्या सोनाली आंदेकर यांनी शिवसेना शिंदे गटाच्या प्रतिभा धंगेकर यांचा पराभव केला.

वडगाव शेरीतील प्रभाग क्रमांक ३ आणि ४ मध्येही राजकीय उलथापालथ पाहायला मिळाली. शरद पवार गटाचे आमदार बापूसाहेब पठारे असतानाही त्यांचा मुलगा सुरेंद्र पठारे आणि सून ऐश्वर्या पठारे भाजपच्या तिकिटावर निवडून आले. त्यामुळे शरद पवारांच्या आमदारांच्या घरातच कमळ फुललं अशी चर्चा शहरभर रंगली.

एकूणच पुणे महापालिकेचा निकाल हा भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा, आक्रमक प्रचाराचा आणि स्थानिक नेतृत्वावर पुणेकरांनी दाखवलेल्या विश्वासाचा विजय ठरला आहे. दुसरीकडे अजित पवारांचा पुण्यातील दबदबा कमी झाल्याचं हे स्पष्ट संकेत देणारा निकाल ठरला असून आगामी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने हा निकाल अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

### संक्षिप्त

#### जनतेचा कौल सर्वोच्च, तो पूर्ण आदराने स्वीकारतो : अजित पवार

**मुंबई, ता. १६ :** महानगरपालिका निवडणुकांच्या निकालांवर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेच्या निर्णयाचा सन्मानपूर्वक स्वीकार केल्याचे सांगितले. जनतेचा कौल सर्वोच्च असून तो आम्ही पूर्ण आदराने स्वीकारतो, असे त्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचे अजित पवार यांनी अभिनंदन करत त्यांच्या यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच ज्या ठिकाणी अपेक्षित यश मिळाले नाही, त्या ठिकाणी जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी अधिक जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमाने काम केले जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आपापल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकास व लोककल्याणाच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान, पराभूत उमेदवारांनाही संदेश देताना अजित पवार म्हणाले की, निराश न होता जनतेसाठी सातत्याने काम करत राहावे, हेच आपले ध्येय असले पाहिजे.

#### शनिवार-रविवारही जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय सुरू

**यवत, ता. १६ :** राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२६ मध्ये होणार असून त्यात पुणे जिल्हा परिषद व जिल्ह्यातील पंचायत समित्यांचा समावेश आहे. या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

या निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गातील इच्छुक उमेदवार जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज दाखल करणार आहेत. अर्जदारांची गैरसोय होऊ नये यासाठी शनिवारी १७ जानेवारी रविवारी १८ जानेवारी २०२६ या शासकीय सुट्टीच्या दिवशीही जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांचे कार्यालय सकाळी पाऊणे दहा ते सायंकाळी सव्वा सहा वाजता या वेळेत सुरू राहणार आहे, अशी माहिती उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य संजय दाणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या दिवशी सर्व संबंधित कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

# लोणी काळभोर येथील एमआयटी गुरुकुलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

**लोणी काळभोर, ता. १६ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल (सीबीएसई) शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमधील क्रीडा व कला-गुणांना चालना देणारा हा महोत्सव शाळेच्या क्रीडा परंपरेचा गौरव करणारा ठरला.




वार्षिक क्रीडा महोत्सवाचा कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या अर्जुन पुरस्कार विजेत्या व ऑलिम्पियन माजी हॉकी खेळाडू रेखा भिडे आणि जागतिक क्रमवारीत १३ व्या क्रमांकाच्या स्नूकर व बिलियर्ड्स खेळाडू अरांट्झा सँचिस यांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी शाळेच्या प्राचार्या अरुणा अँथनी, प्रा. पद्माकर फड, कर्नल सँचिस व योगेश नागपाल उपस्थित होते. मुख्याध्यापिका अरुणा अँथनी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शालेय वाद्यवृंद व उपप्राचार्य समवेत भव्य मार्चपास्ट करून उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. यानंतर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते मशाल दौड (टॉर्च रन) पार पडली. बालवर्गाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनमोहक स्वागत नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेले समूह वादन, कराटे प्रात्यक्षिक व धनुर्विद्या सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरले. पूर्वप्राथमिक ते इयत्ता बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वास्तवदर्शी व गतिमान सादरीकरणांनी प्रेक्षकांची दाद मिळवली. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रेखा भिडे म्हणाल्या जर प्रतिभावान व्यक्ती मेहनत करत नसेल तर कठोर परिश्रम प्रतिभेला हरवू शकते. क्षेत्र कोणतेही असो, यशस्वी व्हायचे असेल तर आपल्यामध्ये स्वयंशिस्त असणे गरजेचे आहे. स्नूकर व बिलियर्ड्स खेळाडू अरांट्झा सँचिस यांनी खेळाबरोबर अभ्यासही तेवढाच महत्वाचा आहे, त्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करायला शिकले पाहिजे. आपल्या कृतीमध्ये सातत्य असेल तरच आपण यशस्वी होऊ शकतो. असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. दरम्यान, अंतिम गटगुणवाटपात शाळेतील ब्लू हाऊस विजेता ठरला. कार्यक्रमाच्या समारोपात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लाठी-काठी व लेझीम नृत्य प्रात्यक्षिकातून श्री छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.

# पुणे महापालिका मतमोजणीत गोंधळ; रुपाली पाटील ठोंबरे यांचा मशीन बदलल्याचा आरोप

**पुणे, ता. १६ :** पुणे महापालिकेच्या मतमोजणीदरम्यान राजकीय वातावरण तापल्याचे चित्र पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रुपाली पाटील ठोंबरे यांनी थेट मतमोजणी प्रक्रियेवर आक्षेप घेतल्याने काही काळ गोंधळ निर्माण झाला. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल येथील मतमोजणी केंद्रावर मशीन बदलल्याचा आरोप करत त्यांनी जोरदार हरकत नोंदवली, त्यामुळे मतमोजणी प्रक्रिया तात्पुरती थांबवावी लागली.



प्रभाग क्रमांक २६ मधील मतमोजणी सुरू असताना मशीनमध्ये फेरफार झाल्याचा संशय व्यक्त करत रुपाली पाटील ठोंबरे अचानक मतमोजणी कक्षात दाखल झाल्या. त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे थेट जाब विचारत मशीन बदलण्यात आल्याचा आरोप केला. त्यांच्या आक्षेपानंतर सुमारे एक तासाहून अधिक काळ मतमोजणी थांबवण्यात आली. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली, तर मतमोजणी केंद्राबाहेर मोठी गर्दी जमली.

तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेली पुणे महापालिकेची निवडणूक यंदा विशेष चर्चेचा विषय ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट झाल्यानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटाची युती झाली असून, रुपाली पाटील ठोंबरे यांना उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी एबी फॉर्म मिळाला होता. त्यामुळे या प्रभागातील लढत प्रतिष्ठेची मानली जात आहे.

रुपाली पाटील ठोंबरे या प्रभाग क्रमांक २६ सह दोन जागांवर निवडणूक लढवत असून, त्यांची लढत अत्यंत चुरशीची ठरली आहे. मतमोजणीदरम्यान झालेल्या वादामुळे निकाल जाहीर होण्यास विलंब झाला असून, मतमोजणीच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महापालिकेच्या निवडणुका शहराच्या पुढील पाच वर्षांचा कारभार ठरवणाऱ्या असल्याने मतमोजणी प्रक्रियेत कोणताही संशय लोकशाहीसाठी गंभीर मानला जातो. या घटनेमुळे निवडणूक यंत्रणेवर दबाव वाढला असून, मतमोजणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि काटेकोर नियंत्रणाची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# मुंबईतील निवडणूक निकालात शिवसेना ठाकरे गटाची शिंदे गटावर आघाडी

**मुंबई, ता. १६ :** आपलीच शिवसेना खरी, ठाकरे गट आहे कुठे, असा सवाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या नेतेमंडळींकडून केला जात होता. प्रत्यक्षात निवडणूक कलावरून मुंबईत तरी ठाकरे गटाने शिंदे यांच्यावर मात केली आहे.



मुंबईत सत्तेसाठी भाजप आणि ठाकरे गटात चुरस होती. शिवसेना शिंदे गटाने मात्र ठाकरेंचा पक्ष आहे कुठे, असा सवाल करीत ठाकरे यांना डिवचले होते. निकालाच्या पहिल्या टप्प्यात शिवसेना ठाकरे गट ६० तर शिंदे गट २५ जागांवर आघाडीवर होता. ठाकरे गटाला सत्ता मिळणे कठीण असले तरी शिंदे यांच्यावर मात केली याचे थोडे का असेना ठाकरे गटाला समाधान असेल.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना ठाकरे व शिंदे गटात प्रचंड चुरस निर्माण झाली होती. लोकसभा निवडणुकीत मुंबईत ठाकरे गटाचे तीन तर शिंदे गटाचा एक खासदार निवडून आला होता. विधानसभा निवडणुकीतही ठाकरे गटाला शिंदे यांच्यापेक्षा अधिक यश मिळाले होते. महानगरपालिकेतही हाच कल कायम राहिला आहे.

शिंदे गटाने कायदेशीरदृष्ट्या आपलीच शिवसेना ही खरी शिवसेना असल्याचा कायम दावा केला. ठाकरे गट आहे कुठे, असा सवाल केला होता. शिवसेनेतील फुटीवर अजूनही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. जनतेच्या न्यायालयात मात्र मुंबईतील तिन्ही निवडणुकांमध्ये ठाकरे गट हा शिंदेपेक्षा वरचढ असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत आमच्याच शिवसेनेला जनतेने कौल दिल्याचे शिवसेना खासदार अरविंद सावंत यांनी म्हटले आहे.

# थेऊर पंचायत समिती गणातून संग्राम कोतवाल मैदानात

## विकासाभिमुख व पारदर्शक कारभाराचा संकल्प



**पुणे, ता. १६ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान, तर ६ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर थेऊर पंचायत समिती गणातून संग्राम कोतवाल यांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवत दंड थोपटले आहेत.

संग्राम कोतवाल हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, स्वच्छता आणि विविध विकासकामांमध्ये सक्रिय आहेत. ग्रामपातळीवर रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत, महिला सक्षमीकरण तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे.

निवडणूक प्रचारासाठी प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रकात नेतृत्व झुंजार, काम दमदार असा संदेश देत त्यांनी विकासाभिमुख व पारदर्शक कारभाराचा संकल्प मांडला आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचा निर्धार कोतवाल यांनी पुणे प्राईम न्यूजशी बोलताना व्यक्त केला.

गणातील सर्व गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी निधीचा योग्य वापर, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभाग वाढवणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे संग्राम कोतवाल यांनी सांगितले. स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा बळकट करणे आणि शैक्षणिक सुविधांचा विस्तार या मुद्द्यांना प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, थेऊर पंचायत समिती गणात यंदाची निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता असून विविध उमेदवारांनी तयारी सुरू केली आहे. अशा परिस्थितीत संग्राम कोतवाल यांचा विकासाचा अजेंडा आणि स्थानिक पातळीवरील कामाचा अनुभव मतदारांवर किती प्रभाव टाकतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## संक्षिप्त



### ऐश्वर्या पठारे विजयी, वडगाव शेरीत कमळ फुलले

**पुणे, ता. १६ :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत वडगाव शेरी परिसरातील प्रभाग क्रमांक ३ आणि ४ मधील लढत शहराच्या राजकारणात चर्चेचा विषय बनली आहे. शरद पवार गटाचे आमदार बापूसाहेब पठारे असतानाही, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि ऐश्वर्या पठारे यांनी प्रभाग क्रमांक ३ मधून विजय मिळवून राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारंपरिक बालेकिल्ल्यात भाजपला मोठं यश मिळवून दिलं. सुरेंद्र पठारे प्रभाग क्रमांक ४ मधून लढले, परंतु प्रभाग ३ मधील ऐश्वर्या पठारे यांचा विजय चर्चेचा विषय ठरला आहे. या घरातील राजकीय दुभंगामुळे प्रचार कालावधीतच शहरभर गाजले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चंदननगर येथील सभेत सुरेंद्र पठारे यांच्यावर टँकर माफिया, ड्रग्स, दादागिरी यांसह निवेदनात्मक टीका केली होती.निवडणूक निकालामुळे फक्त स्थानिकच नव्हे, तर पुण्यातील बदलत्या राजकीय समीकरणांची दिशा देखील स्पष्ट झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या गडातच भाजपने घुसखोरी केली असल्याने या विजयाला राज्यस्तरीय राजकारणातही महत्त्वाचे मानले जात आहे. ऐश्वर्या पठारे यांच्या यशामुळे वडगाव शेरीमध्ये भाजपच्या सत्ताधिकाराची नवी दृष्टी स्पष्ट झाली आहे.

### निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर निवेदिता सराफ भडकल्या



**मुंबई, ता. १५ :** महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) सकाळपासून मतदान सुरू आहे. मात्र निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांसह सेलिब्रेटीही हैराण झाले आहेत. मराठी अभिनेत्री निवेदिता सराफ यांना देखील हा मनस्ताप सहन करावा लागला. मतदार यादीतील गोंधळामुळे निवेदिता सराफ यांना एक तास या केंद्रावरून त्या केंद्रावर चकरा मराव्या लागल्या. याबाबत निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारावर त्यांनी संताप व्यक्त केला आहे. मी विलेपार्ले येथील मतदान केंद्रावर मतदानासाठी गेले होते. मात्र तेथे माझे नावच मतदार यादीत नव्हते. त्यांनी मला २५ नंबरला जाण्यास सांगितले. तेथे गेले तोवर निवडणूक कर्मचारी गेली होती. प्रत्येक सोसायटीचे गट पाडले असून त्या गटातील मतदार या मतदान केंद्रात येऊन मतदान करतील असे ठरवले आहे. मात्र आमच्या बिल्डिंगची नावे का नाहीत? नाव आहे तर सिरीज नंबरच नाही. मोबाईल आतमध्ये नेऊ देत नाही, नाहीतर फोटो काढला असता, अशी संतप्त प्रतिक्रिया निवेदिता सराफ यांनी दिली.

### जेलमध्ये असलेल्या सोनाली अंदेकर विजयी; प्रतिभा धंगेकर पराभूत



**पुणे, ता. १६ :** ज्या निवडक लढतींकडे संपर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलं होतं त्या आंदेकर आणि धंगेकरांच्या प्रभागात आंदेकरांचा विजय झाला आहे. जेलमधून निवडणूक लढवलेल्या सोनाली आंदेकर विजयी झाल्या असून प्रतिभा रवींद्र धंगेकर यांचा पराभव झाला आहे. आंदेकर विरुद्ध धंगेकर अशी काँटे की टक्कर झाली होती चौथ्या फेरीत सोनाली आंदेकर ८५६ मतांनी आघाडीवर होत्या. अखेर त्यांचा विजय झाला आहे. सोनाली आंदेकर ह्या गुंड बंडू आंदेकरची सून आहेत. सोनाली आंदेकरांवर आयुष कोमकर हत्येचा कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्यांनी तुरुंगातून लढत दिली होती. पुण्यासह राज्यात या निवडणुकीची चर्चा होती. दरम्यान, याच प्रभागात आंदेकर कुटुंबातील आणखी एक सदस्य लक्ष्मी आंदेकर यादेखील राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडणुकीत उतरल्या होत्या. दोघींना न्यायालयाने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सशर्त परवानगी दिली होती, परंतु जामीन अर्ज फेटाळले आहेत.

### राज्यात भाजपने इतिहास रचला : फडणवीस

**मुंबई, ता. १६ :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी आज मतमोजणी होतेय. ८९३ वॉर्डमध्ये एकूण १५ हजार ९३१ उमेदवारांनी निवडणूक लढवली. सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नवी मुंबई, कोल्हापूर, सांगली मिरज कुपवाड, सोलापूर, अहिल्यानगर, नांदेड, जळगाव, जालना, अकोला, पनवेल, मिरा-भाईंदर , धुळे, पिंपरी-चिंचवडसह एकूण २३ ठिकाणी भारतीय जनता पक्ष आघाडीवर होता. लातूरमध्ये काँग्रेसला तर परभणीमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाला एकहाती सत्ता मिळालीय. महानगरपालिका निवडणुकीतील विजयाबद्दल मुंबईतील भाजप कार्यालयात जल्लोष साजरा करण्यात येत होता. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले.

# लातूरमध्ये काँग्रेसचा दणदणीत विजय; भाजपा-शिंदे गटाचा दारुण पराभव

**लातूर, ता. १६ :** काँग्रेसचे दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसवून टाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपाची लातूरमध्ये मोठी पिछेहाट झाल्याचे पाहायला मिळत आहे. लातूर महापालिका निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीने ४७ जागांसह बहुमताचा आकडा पार केला आहे; तर भारतीय जनता पक्षाला केवळ २२ जागांवरच आघाडी मिळाली आहे. त्याशिवाय अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एका जागेवर आघाडी मिळाली आहे. शिंदे गटाला या निवडणुकीत भोपळाही फोडता आलेला नाही. त्यामुळे लातूरमध्ये काँग्रेस पक्षाचाच महापौर होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. गेल्यावेळी लातूर महापालिका निवडणुकीत भाजपाने विजय मिळवून काँग्रेसला पराभवाचा धक्का दिला होता.

यंदा महापालिका निवडणुकांचा प्रचार सुरू असताना भाजपाचे प्रदेशाध्य रवींद्र चव्हाण यांनी लातूर शहरामधून विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसल्या जातील यात शंका नाही, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानानंतर मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता. काँग्रेसने या वक्तव्याप्रकरणी चव्हाण यांनी माफी मागावी अशी मागणी केली होती; तर विलासराव देशमुख यांचे पुत्र आमदार अमित देशमुख यांनी चव्हाण यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती. त्याशिवाय लातूरमधील अनेक जुन्या जाणत्या राजकारण्यांनी भाजपा प्रदेशाध्यक्षांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला होता.



रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेसने लातूर महापालिकेची निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली होती. गुरुवारी महापालिकेच्या एकूण ७० जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. यंदा महापालिकेत जवळपास ७० टक्के मतदान झाल्याचे निवडणूक आयोगाच्या आकडेवारीतून समोर आले. या निवडणुकीत काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात मुख्य लढत होती. भाजपाला शह देण्यासाठी काँग्रेसने प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीबरोबर युती केली. यावेळी सर्व पक्षांचे मिळून एकूण ३६९ उमेदवार रिंगणात होते.

शुक्रवारी सकाळी १० वाजता महापालिकेच्या मतमोजणीला सुरुवात झाली. त्यावेळी भारतीय जनता पक्षाने सुरुवातीच्या कलामध्ये मोठी आघाडी घेतली होती. परंतु दुपारनंतर महापालिकेचे चित्र पालटताना दिसून आले. काँग्रेस व वंचित बहुजन पक्षाच्या युतीने मोठी मुसंडी मारत बहुमताचा आकडा पार केला. मतमोजणीचे शेवटचे कल हाती आले तेव्हा लातूरमध्ये काँग्रेसच्या आघाडीने ४७ जागांवर आघाडी घेतली होती; तर भाजपाचे केवळ २२ जागांवरील उमेदवार आघाडीवर होते. त्याशिवाय अजित पवार यांच्या पक्ष एका जागेवर आघाडीवर होता. विशेष बाब म्हणजे- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला या महापालिकेत भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे लातूरमध्ये काँग्रेसची सत्ता येणार असल्याचे जवळपास झाले आहे.

## महापालिका रणांगणात भाजपची धडक

### मुंबई-पुण्यासह २९ महापालिकांवर वर्चस्व, मित्रपक्षांनाही फटका

**पुणे, ता. १६ :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांत भाजपने अभूतपूर्व यश मिळवीत मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह अनेक महापालिकांवर सत्ता काबीज केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने विरोधकांनाच नव्हे, तर महायुतीतील मित्रपक्ष शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांनाही मोठा धक्का दिला आहे.

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्रातील मुंबई, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, पनवेल, वसई-विरार या महापालिकांमध्ये भाजपने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. काही ठिकाणी शिवसेनेसोबत युती असतानाही भाजपने अधिकाधिक जागांवर विजय मिळविला, तर



शिवसेनेला अपेक्षेपेक्षा कमी यशावर समाधान मानावे लागले.

मुंबई महापालिकेत भाजपने १३७ जागा लढवून ९० हून अधिक जागांवर विजय मिळविला. याउलट शिवसेनेला लढविलेल्या जागांपैकी केवळ ३० च्या आसपास जागा मिळाल्या. २०१७ मध्ये सत्तेत असलेल्या शिवसेनेचे वर्चस्व यावेळी लक्षणीयरीत्या कमी झाले असून मुंबईवर भाजपचे प्राबल्य सिद्ध झाले आहे. ठाणे जिल्हा व नवी मुंबईतही भाजपने शिवसेनेचे वर्चस्व मोडून काढले. मीरा-भाईंदर, पनवेल आणि वसई-विरार महापालिकांत भाजपने आपली ताकद दाखवत सत्ता मिळविली. अनेक ठिकाणी युती असूनही शिवसेनेचे उमेदवार पराभूत झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, पुणे व पिंपरी-चिंचवड या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात भाजपने थेट लढत देत विजयाचा झेंडा रोवला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील यांच्यासह स्थानिक नेतृत्वाच्या जोरावर भाजपने राष्ट्रवादीचा गड उद्ध्वस्त केला. या निकालामुळे अजित पवार व शरद पवार यांच्या प्रभावालाही मोठा धक्का बसला आहे. एकूणच, महापालिका निवडणुकांतील निकालांनी राज्यातील राजकीय समीकरणे बदलली असून भाजपने शहरी भागात आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.

## शिवसेना ठाकरेचे उमेदवार नितीन गावडे विजयी

**पुणे, ता. १६ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या सुरुवातीच्या कलांमध्ये पिछाडीवर असलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अखेर पुण्यात आपला 'भोपळा' फोडला आहे. हडपसर भागातील प्रभाग क्रमांक १६ मधून शिवसेणा ठाकरेचे उमेदवार नितीन गावडे यांनी विजय मिळवला आहे. हा पुण्यातील शिवसेना पक्षाचा पहिला अधिकृत निकाल असून कार्यकर्त्यांमध्ये काहीसे हायसे वातावरण आहे.

हडपसर हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. मात्र, पक्षातील फुटीनंतर या जागेवर कोणाचे वर्चस्व राहणार, याकडे सर्वांचे लक्ष होते. नितीन गावडे यांनी भाजप आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांना कडवी झुंज देत ही जागा खेचून आणली आहे. त्यांच्या विजयामुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने



पुण्यात आपले अस्तित्व असल्याचे दाखविले आहे.

पुण्यात एकामागून एक भाजपचे उमेदवार निवडून येत असताना, हडपसरमधील या विजयाने ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा दिलासा मिळाला आहे. पुण्याच्या १६५ जागांपैकी शिवसेना ठाकरे यांनी जिंकलेली ही पहिली जागा आहे. भाजपच्या झंझावातामध्ये आता वसंत मोरेंची एकच जागा आणखी एक दिलासा देण्याची शक्यता आहे.

## सोलापुरात सरवदे हत्या प्रकरणातील संशयित आरोपी शालन शिंदेंचा विजय

**सोलापूर, ता. १६ :** सोलापूर महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक २ (क) मध्ये भाजपाच्या उमेदवार शालन शिंदे यांचा विजय झाला आहे. शालन शिंदे या भाजपाच्या तिकिटावर विजयी झाल्या आहेत. सोलापूरमध्ये बाळासाहेब सरवदेंची हत्या झाली. या प्रकरणात शालन शिंदेंच संशयित आरोपी होत्या. त्या विजयी झाल्यानंतर मनसेचे पदाधिकारी उद्विग्न झाले आहेत.

आमदार विजयकुमार देशमुख यांचे पुत्र किरण देशमुख, कल्पना कारभारी, नारायण बनसोडे आणि हत्येच्या आरोपात तुरुंगात असलेल्या उमेदवार शालन शिंदे विजयी झाल्या आहेत. प्रभाग दोनमधील उमेदवारी माघार घेण्यावरून मनसेचे युवा नेते बाळासाहेब सरवदे यांची हत्या झाली होती. येथील प्रभागातील विजयी



उमेदवारांची अधिकृत आकडेवारी यायची आहे, मात्र सुमारे ४ हजार मतांनी शालन शिंदे विजयी झाल्याचे सांगण्यात येते. तर, आमदार विजयकुमार देशमुख यांचे पुत्र किरण देशमुख सुमारे ११ हजार मतांनी विजयी झाले आहेत.

शालन शिंदे यांच्याबाबत १२ दिवसांपूर्वी मनसेने काय म्हटलं होतं? बाळासाहेब पांडुरंग सरवदे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष होते, अमित ठाकरे यांचा सोलापूर येथील राईट हँड म्हटलं जायचं. पक्षांतर्गत राजकारणामध्ये एका पक्षाच्या आमदाराने त्यांच्या पॅनलला बिनविरोध निवडून आणण्यासाठी मनसेच्या शहराध्यक्षाचा बळी दिला. मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगायचे आहे की, निवडणुकांमध्ये दबावतंत्राचा वापर बंद झाला पाहिजे. असे मनसेचे नेते प्रशांत इंगळे म्हणाले. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी ही हत्या झाली असून नगरसेविका शालन शंकर शिंदे, शंकर बाबू शिंदे यांच्यासह इतरांनी यांनी सरवदे यांना मारहाण केल्याचा आरोपही इंगळे यांनी केला होता. दरम्यान आता शालन शिंदे यांचा विजय झाल्यानंतर ही लोकशाहीची हत्या आहे अशी टीका इंगळे यांनी केली आहे.

## पुणे महापालिकेत सई थोपटेंचा विजय; सर्वात तरुण नगरसेवक ठरल्या

**पुणे, ता. १६ :** पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३६ (क) मधून भारतीय जनता पक्षाच्या सई थोपटे यांनी दणदणीत विजय मिळवला असून त्या पुण्यातील सर्वात तरुण नगरसेवक ठरल्या आहेत. सई थोपटे सध्या पुण्यातील नामांकित सिम्बायोसिस महाविद्यालयात बीबीएच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. कॉलेजचा वर्ग सुरू असतानाच त्यांना भाजपकडून उमेदवारी जाहीर झाली होती. विद्यार्थिनी अवस्थेत थेट निवडणूक लढवून विजय मिळवणे हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

सई थोपटे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून पुण्यात विविध सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांवर सक्रिय सहभाग नोंदवला होता. विविध कार्यक्रम, आंदोलनांतून त्यांनी तरुणांचे प्रश्न मांडले असून कॉलेज जीवनातही ठाम आणि स्पष्ट भूमिका घेण्याची त्यांची ओळख आहे.



राजकारणात त्या नवख्या असल्या तरी त्यांना संघटनात्मक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांचे वडील प्रशांत थोपटे हे गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे सक्रिय पदाधिकारी आहेत. पर्वती विधानसभा मतदारसंघात उपाध्यक्ष, सरचिटणीस, विधानसभा निवडणूक संयोजक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत. पर्वती, सहकारनगर आणि धनकवडी परिसरात भाजप पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे.

पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांनी थोपटे कुटुंबीयांची भाजपप्रती असलेली एकनिष्ठा आणि सई थोपटेंची तरुणांमधील लोकप्रियता लक्षात घेऊन त्यांना पुणे महानगरपालिकेची उमेदवारी देण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यांच्या विजयामुळे पुणे शहराला तरुण, अभ्यासू आणि ऊर्जावान नेतृत्व मिळाल्याची चर्चा सुरू आहे.

## समाधान सरवणकर यांचा पराभव; निशिकांत शिंदेंनी मारली बाजी

**मुंबई, ता. १६ :** मुंबईतील प्रभाग क्रमांक १९४ मधील मतमोजणीतुन महत्वाची माहिती समोर आली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे निशिकांत शिंदे हे या प्रभागातून विजयी झाले आहेत. त्यांनी एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे उमेदवार समाधान सरवणकर पराभूत यांचा पराभव केला आहे.

समाधान सरवणकर यांचा निशिकांत शिंदे यांनी ५८२ मतांच्या फरकाने आघाडीवर घेत निकाल आपल्या बाजूने वळवत यश मिळवले आहे. या निकालामुळे शिंदेंच्या शिवसेनेचे समाधान सरवणकर यांचा पराभव निश्चित झाला आहे. मतमोजणीच्या प्रत्येक फेरीसोबत चित्र स्पष्ट होत असून या प्रभागात ठाकरेंच्या शिवसेनेला यश मिळत असल्याचे सध्याचे कल दर्शवत आहेत.

दरम्यान, प्रभाग १९४ हा



शिवसेनेचा (शिंदे गट) बालेकिल्ला मानला जात होता. समाधान सरवणकर यांना पराभूत करणे हे निशिकांत शिंदे यांच्यासमोर मोठे आव्हान होते. सुरुवातीच्या फेऱ्यांपासूनच शिंदे यांनी आघाडी घेण्यास सुरुवात केली होती. शेवटच्या फेरीपर्यंत ही चुरस कायम होती, मात्र अखेर मतदारांनी निशिकांत शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत त्यांना विजयाची माळ घातली.

ज्याचा उदय प्रभादेवीमध्ये झाला त्याचा अस्त देखील प्रभादेवीत व्हायला हवा. मतदारांचा मी ऋणी आहे. सरवणकर कुटुंबाने बाळासाहेबांना आणि उद्धव ठाकरेंना त्रास दिला. त्यांना गाडण्याचे काम सर्व मतदारांनी केले. त्यांनी आमच्यावर आरोप केले पण आमच्याकडे सत्ता नव्हती. गेली वर्षभर मी प्रश्न सोडवत आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक आमदार महेश सावंत यांनी दिली.

## मोहोळांच्या चक्रव्यूहात अजित पवार अडकलेच; पुणे मॉडेल यशस्वी; राष्ट्रवादीचा बालेकिल्ला ढासळला

**पुणे, ता. १६ :** पुणे महापालिकेच्या निवडणूक निकालांनी शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवली आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीत भाजपने जोरदार मुसंडी मारत पुण्यात पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. प्राथमिक कलांनुसार भाजप जवळपास जागांपर्यंत मजल मारण्याच्या स्थितीत असून, राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसल्याचे स्पष्ट झाले आहे. अजित पवार विरुद्ध केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ अशी रंगलेली प्रतिष्ठेची लढाई अखेर भाजपच्या पारड्यात गेली आहे.

पुणे शहरासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. मेट्रो, रस्ते, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचे प्रश्न प्रचाराच्या केंद्रस्थानी होते. भाजपने विकासाचा अजेंडा पुढे ठेवत मेट्रो विस्तार, भुयारी रस्ते, स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्थापन आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांवर भर दिला. त्याउलट राष्ट्रवादी काँग्रेसने मोफत पीएमपी बससेवा, मोफत मेट्रो प्रवास आणि छोट्या घरांना मिळकतकर माफी अशा लोकलाभाच्या घोषणा केल्या. मात्र पुणेकरांनी फुकटच्या आश्वासनांपेक्षा विकासालाच पसंती दिल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

भाजपच्या विजयामागे मजबूत संघटनात्मक बांधणी निर्णायक



ठरली. बूथस्तरावर केलेली काटेकोर तयारी, कार्यकर्त्यांची एकजूट आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अप्रत्यक्ष पाठिंबा भाजपसाठी फायदेशीर ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. काही प्रभागांमध्ये हिंदुत्ववादी भूमिका प्रभावी ठरली, तर अनुभवी नेत्यांच्या कुटुंबीयांना उमेदवारी दिल्याने भाजपला तुलनेने कमी खर्चात यश मिळाले.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसला उमेदवार निवडीचा मोठा फटका बसला. काही ठिकाणी वादग्रस्त आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना तिकीट दिल्याने पक्षावर जोरदार टीका झाली होती. त्याचा थेट परिणाम मतदानावर झाल्याचे दिसून आले. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली जाहीर मुलाखत आणि अजित पवारांवर केलेली आक्रमक टीका भाजपसाठी टर्निंग पॉइंट ठरल्याचे मानले जात आहे.

या निकालांमुळे पुण्यातील सत्तासमीकरण पूर्णपणे बदलण्याची चिन्हे आहेत. भाजप पुन्हा महापौरपदावर दावा ठोकण्याच्या स्थितीत असून, राष्ट्रवादी काँग्रेससाठी ही निवडणूक आत्मपरीक्षणाची वेळ ठरणार आहे. पुणेकरांनी दिलेला हा कौल विकासाच्या राजकारणाला मिळालेली स्पष्ट मान्यता मानली जात आहे.

# पुणे-सोलापूर महामार्गावर डिझेल चोरट्यांचा धुमाकूळ; एका रात्रीत ८१० लिटर डिझेल चोरी



**पुणे, ता. १६ :** पुणे-सोलापूर महामार्गावर डिझेल चोरीच्या घटनांमध्ये पुन्हा वाढ झाल्याचे चित्र समोर आले आहे. दौंड तालुक्यातील यवत आणि सहजपूर परिसरात एका रात्रीत तीन मालवाहू ट्रकमधून तब्बल ८१० लिटर डिझेल चोरीला गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चोरी झालेल्या डिझेलची अंदाजे किंमत सुमारे ७० हजार ४७० रुपये असून, या प्रकारामुळे महामार्गावर प्रवास करणाऱ्या ट्रकचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवारी (१३ जानेवारी) रात्री पुणेसोलापूर महामार्गावर अनेक ट्रकचालकांनी विश्रांतीसाठी हॉटेल व ढाब्यांच्या पार्किंगमध्ये वाहने उभी केली होती. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी डिझेल चोरीचा डाव साधला. यवत येथील हॉटेल राउंड ४५ समोरील पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दोन ट्रकमधून ५६० लिटर डिझेल काढून नेण्यात आले. हे ट्रक पनवेलहून टेंभुर्णीकडे जात होते.

दुसरी घटना सहजपूर परिसरातील सिंधू पंजाबी ढाबा येथे घडली. येथे उभ्या असलेल्या एका ट्रकमधून २५० लिटर डिझेल चोरीला गेले. सकाळी वाहन सुरू करताना डिझेल टाकी रिकामी आढळल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला.

पुणेसोलापूर महामार्ग हा राज्यातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, अपुरी प्रकाशव्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव आणि रात्रीची अपुरी पोलीस गस्त यामुळे डिझेल चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याचे दिसून येत आहे. डिझेलच्या वाढत्या दरामुळे ही चोरी संघटित टोळी करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या घटनांमुळे ट्रक चालकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, प्रवासातही अडथळे निर्माण होत आहेत. महामार्गावर सुरक्षित पार्किंग, सीसीटीव्ही व्यवस्था आणि नियमित गस्त वाढवण्याची मागणी वाहनचालकांकडून जोर धरत आहे.

# लोणी काळभोर येथे तरुणीच्या घरात घुसून बळजबरीचा प्रयत्न; एकावर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १६ :** घरी कोणीही नसल्याची संधी साधून बारावीच्या विद्यार्थिनीच्या घरात घुसून बळजबरीने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. नराधमाच्या अत्याचाराला विरोध केल्याने विद्यार्थिनीला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार लोणी काळभोर परिसरात बुधवारी (ता.१४) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडला आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समीर अकबर हाश्मी (रा. कदम वाकवस्ती, ता. हवेली, जिल्हा-पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका




१९ वर्षीय पिडीतेने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. परंतु, या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीता या लोणी काळभोर परिसरातील एका नामांकित शाळेत इयत्ता बारावीच्या वर्गात शिकत आहे. सन २०२१ पासून समीर हाश्मी याने पिडीतेला वेळोवेळी तु मला हो म्हण नाही तर तुला मी जगू देणार नाही, तुला शिक्षण घेऊ देणार नाही, तुला मानसिक त्रास देऊन, तुझा छळ करणार आहे. मी पोलीस स्टेशनला घाबरत नाही, मी दुसऱ्या दिवशी सुटुन बाहेर येईन? असे म्हणाला. काहीही केल्यानंतर पिडीता हो म्हणत नसल्याने आरोपीने तिला धमकी देण्यास सुरवात केली.

आरोपी समीर हाश्मी याने पिडीतेकडून हो म्हणून वदवून घेण्यासाठी तिच्या आई वडीलांना जीवे मारण्याची व बहीणीला शाळा सुटल्यानंतर उचलून नेण्याची वारंवार धमकी दिली आहे. तसेच पिडीता या बुधवारी (ता. १४) दुपारी घरी एकट्या होत्या. तेव्हा घरामध्ये कोणीही नसल्याचा गैरफायदा घेऊन आरोपी समीर हाश्मी हा जबरदस्तीने घरात घुसला.

दरम्यान, घरात जबरदस्तीने घुसल्यानंतर आरोपी समीर हाश्मी याने पिडीतेचा गळा दाबला आणि सेक्स करायचा असे बोलून टी-शर्ट बाजुला करुन सेक्स करण्याचा प्रयत्न करु लागला. आरोपीच्या अत्याचाराला विरोध करुन पिडीतेने ओरडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपी समीर हाश्मी याने पिडीतेच्या ओठावर जोरात बुक्की मारुन जखमी केले.

पिडीत विद्यार्थिनीच्या मनाविरुध्द आरोपीने बळजबरीने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. तिच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न करणारे वर्तन केले आहे. म्हणून पिडीतेने याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी समीर हाश्मी याच्यावर भारतीय न्याय संहीता कलम ७४ , ७५ , ७८ , ३५१, ३३१, ११५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूढील तपास लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ नाळे करत आहेत.

# पूर्व हवेलीतील एका नामांकित डॉक्टरांचे अपहरण करून उकळली १९ लाखांची खंडणी

## उरुळी कांचन पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. १६ :** पूर्व हवेलीतील एका नामांकित डॉक्टरांचे अपहरण करून जीवे ठार मारण्याची धमकी देत तब्बल १९ लाख रुपयांची खंडणी उकळल्याची गंभीर व धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाच अनोळखी इसमांविरोधात उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हि घटना शनिवारी (ता. १०) ते सोमवारी (ता. १२) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास प्रयागधाम फाट्याच्या पुढे इनाम दारवस्ती परिसरात घडली आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी डॉक्टर यांचे पुणे-सोलापूर महामार्गावरील एका गावात स्वतःचे रुग्णालय आहे. शनिवारी रात्री सव्वा दहा ते साडे दहा वाजता त्यांच्या चारचाकी गाडीने प्रवासासाठी निघाले होते. यावेळी त्यांच्याबरोबर गाडी चालक व रुग्णालयातील एक मदतनीसही सोबत होते.

कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनामदारवस्ती परिसरात आले असता पांढऱ्या रंगाच्या एर्टीगा कारने आलेल्या पाच अनोळखी इसमांनी त्यांची गाडी अडवली. आरोपींनी तिघांचे अपहरण करून धारदार शस्त्राचा धाक दाखवत फिर्यादीला मारहाण केली. तसेच एका आरोपीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या दंडाला चावा घेतल्याचा प्रकार घडला.

आरोपींनी फिर्यादी, त्यांचे सहकारी व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे ठार मारण्याची धमकी देत २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. अखेर आरोपींनी जबरदस्तीने १९ लाख रुपये रोख स्वरूपात स्वीकारून तिघांना ताब्यात ठेवले. हा प्रकार सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुरू होता. फिर्यादी डॉक्टर यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी विलंब केल्याने सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमान्वये अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, गुन्हा दाखल होताच उपविभागीय पोलीस अधिकारी दौंड विभाग बापूराव दडस, पोलीस निरीक्षक सचिन वांगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सिद्ध पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे करीत आहेत.

# प्रशांत जगतापांची अभिजित शिवरकरांवर मात; ९ वर्षांनंतर वानवडीत काँग्रेसचं कमबॅक

**पुणे, ता. १६ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीच्या निकालात वानवडी परिसरातून मोठा राजकीय धक्का आणि तितकाच मोठा संदेश देणारा निकाल समोर आला आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले माजी महापौर प्रशांत जगताप यांनी प्रभाग क्रमांक १८ ड मधून भाजपच्या उमेदवाराचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह पुण्यात काँग्रेसने खाते उघडले असून शहराच्या राजकारणात नवे समीकरण आकाराला येताना दिसत आहे.

ही लढत केवळ प्रभागापुरती मर्यादित नव्हती, तर ती राजकीय निष्ठा, पक्षांतर आणि नेतृत्वाच्या संघर्षाची प्रतिकात्मक लढाई बनली होती. माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांचे पुत्र अभिजीत शिवरकर यांनी ऐनवेळी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांच्याविरोधात प्रशांत जगताप मैदानात उतरले होते. अटीतटीच्या लढतीत जगताप यांनी तब्बल १८०० मतांनी विजय मिळवत भाजपला मोठा धक्का दिला.

या निकालाचे महत्त्व यासाठी अधिक वाढते कारण प्रशांत जगताप हे गेल्या दोन दशकांहून अधिक काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख होती. १९९९ पासून राष्ट्रवादीत सक्रिय असलेले जगताप



२००७, २०१२ आणि २०१७ या तीनही महापालिका निवडणुकांत वानवडी परिसरातून निवडून आले. २०१६-१७ मध्ये त्यांनी पुण्याचे महापौरपदही भूषवले.

२०२३ मध्ये राष्ट्रवादीत फुट पडल्यानंतर त्यांनी शरद पवार गटात राहण्याचा निर्णय घेतला. मात्र महापालिका निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि पहिल्याच निवडणुकीत विजय मिळवून आपली ताकद सिद्ध केली.

विजयानंतर बोलताना जगताप म्हणाले, चार आमदार आणि दोन माजी राज्यमंत्री माझ्या विरोधात उभे होते. तरीही वानवडीच्या जनतेने माझ्यावर विश्वास ठेवला. हा विजय विचारधारेचा आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांची विचारधारा कोणी पुसू शकत नाही. या निकालामुळे पुण्यातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली असून काँग्रेसला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र आहे. आता उर्वरित निकालांमधून पुण्याचा कारभारी कोण ठरणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## थंडीमध्ये ओवा खाण्याचे अनेक फायदे

**पुणे, ता. १६ :** थंडीमध्ये ओवा खाण्याचे अनेक फायदे आहेत. पचन सुधारणे, वजन कमी करण्यास मदत होणे असे अनेक फायदे आहेत. ओव्यामध्ये फायबर आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. त्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. ओवा खाण्यामुळे आपली चयापचय क्रिया वाढून आपली चरबी कमी होण्यासही मदत होते. रात्री झोपण्यापूर्वी ओवा खाणे फायदेशीर ठरू शकते. खासकरुन ओवा हा सर्दी-खोकल्यावर प्रभावी मानला जातो. ओव्यामध्ये असलेले थायमॉल श्वसनमार्गातील अडथळे दूर करते आणि खोकल्यापासून आराम देते. ओव्याची वाफ घेणे देखील उपयुक्त आहे.

ओव्यामध्ये दाहक-विरोधी आणि भूल देणाऱ्या गुणधर्मांमुळे सांधेदुखी आणि इतर वेदना कमी करण्यास मदत होते. त्याचबरोबर थायमॉलमुळे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करू शकते. त्वचेसाठी देखील ओवा हा फार फायदेशीर मानला जातो. ओवा हा जळजळीच्या समस्या कमी करतो तसेच त्वचेच्या विविध समस्यांवर ओवा हा फार गुणकारी आहे.

आजकालच्या धावत्या जीवनशैलीमुळे आपल्या खाण्यापिण्याच्या वेळा सतत चुकतात. कामासाठी तासनतास बाहेर राहावे लागत असल्याने बाहेरचे अन्नपदार्थ, फास्टफुड आपण खातो. तसेच अपूर्ण झोप, बिघडलेल्या दिनक्रमाचा सगळ्यात जास्त पोटावर परिणाम होत असतो. यातूनच मग पित्त, ॲसिडिडी, गॅसेस होणं यांसारख्या गोष्टी वारंवार जवळपास सगळ्यांच्याच बाबतीत होतात. वारंवार गॅस होण्यामुळे अनेकदा आपल्याला नकोसे होते. यावर ओवा हा फार महत्त्वाचा मानला जातो.

आपल्या प्रत्येकाच्या घरात ओवा हा असतोच. तुम्हाला जर पोटात मुरडा आल्यासारखे वाटत असेल तर हातावर ओवा थोडा रगडून तुम्हाला तो खायचा आहे. ओव्याचा वास आणि दाताखाली आलेल्या ओव्याच्या रसामुळे तुम्हाला छान आराम मिळेल. ओवा ही अशी गोष्ट आहे जी तुम्ही तुमच्या सोबत सहज कुठेही जाताना बाळगू शकाल.


## अर्शदीपला बाहेर ठेवल्याने अश्विन संतापला

**मुंबई, ता. १६ :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे मालिकेत स्टार गोलंदाज अर्शदीप सिंगला पहिल्या दोन सामन्यांतून वगळल्याने अनुभवी फिरकीपटू आर. अश्विनने संताप व्यक्त केलाय. राजकोटमध्ये भारतीय गोलंदाजांची धुलाई झाल्यानंतर अश्विनने संघ व्यवस्थापनाच्या निर्णयावर सडकून टीका केली. अश्विन म्हणाला की, अर्शदीपने नेहमीच संघासाठी चांगली कामगिरी केलीय, तो सन्मानाने संघात येण्यास पात्र आहे. वर्कलोड मॅनेजमेंटच्या नावाखाली त्याला बाहेर बसवून त्याच्या आत्मविश्वासाशी खेळले जातेय. अर्शदीपचा वनडे रेकॉर्ड दमदार असतानाही त्याला संधी न मिळाल्याने अश्विनने आश्चर्य व्यक्त करत गोलंदाजांवरच नेहमी अन्याय का होतो, असा सवाल विचारलाय.

# महापालिका निवडणुकीतील भाजपचा विजय विकास आणि विश्वासाचा कौल : बावनकुळे

**नागपूर, ता. १६ :** मुंबईसह राज्यातील महापालिका निवडणुकांमधील भाजपचा विजय हा विकास आणि महायुतीवरील जनतेच्या विश्वासाचा कौल असल्याचे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. हा कौल म्हणजे केवळ निवडणुकीचा निकाल नसून, तो देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेतृत्वावर व्यक्त झालेला ठाम विश्वास आहे, असे ते म्हणाले.

मुंबई महापालिकेत भाजप-शिवसेना महायुतीला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता असून, सुरुवातीच्या कलांमध्ये महायुती मोठ्या आघाडीवर असल्याचे दिसत आहे. या कलांमुळे तब्बल वर्षांनंतर मुंबईवरील ठाकरे गटाची सत्ता संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे कल कायम राहिले तर मुंबई महापालिकेची सत्ता महायुतीकडे जाईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच महाराष्ट्राचा वेगाने विकास करू शकते, अशी जनतेची भावना आहे.



### ईव्हीएमवर आरोप करणाऱ्यांना प्रत्युत्तर

ईव्हीहीएमवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या ठाकरे बंधूंवर टीका करताना बावनकुळे म्हणाले, ज्या ठिकाणी त्यांच्या उमेदवारांचा विजय झाला तेथे ईव्हीएम योग्य ठरतात आणि जिथे भाजप जिंकतो तेथेच मशीनवर संशय घेतला जातो, हे जनतेला पटणारे नाही. जनतेला विकास महत्त्वाचा वाटतो. यापुढे महाराष्ट्रात केवळ विकासाच्या मुद्द्यावरच राजकारण होईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्यामुळे भाजप-शिवसेना महायुती दोन-तृतीयांश बहुमतासह आणि सुमारे ५१ टक्के मतवाट्याने मुंबई महापालिकेची सत्ता मिळवेल, असा अंदाज त्यांनी वर्तवला. नागपूर महापालिकेतही जनतेने विकासालाच प्राधान्य दिल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांच्या विकासात्मक धोरणांवर विश्वास व्यक्त करत नागपूरकरांनी विकसित नागपूरला मत दिले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात विकासालाच कौल मिळत असल्याचे प्राथमिक चित्र असून, सायंकाळनंतर संपूर्ण निकाल स्पष्ट झाल्यावर अधिक भाष्य करता येईल, असे ते म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्रातील एकूण नगरसेवकांपैकी सुमारे ५१ टक्के नगरसेवक भाजप व महायुतीचे असतील आणि भाजपला दोन-तृतीयांशपेक्षा अधिक बहुमत मिळेल, असा आत्मविश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या विकासासाठी ठोस व्हिजन मांडले असून, एकनाथ शिंदे यांच्यासह विकसित मुंबईसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. केंद्र सरकारच्या विविध योजनांमुळे मुंबईला मोठे पाठबळ मिळाले, ते म्हणाले.

## नितीन नवीन भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष होणार

**नवी दिल्ली, ता. १६ :** भारतीय जनता पार्टीच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला असून, येत्या २० जानेवारीला पक्षाला नवे नेतृत्व मिळणार आहे. सध्याचे कार्याध्यक्ष नितिन नवीन यांची या पदावर बिनविरोध निवड होण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी या निवडीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केलाय.

या कार्यक्रमानुसार, १९ जानेवारीला दुपारी २ ते ४ या वेळेत उमेदवारी अर्ज भरले जातील. २० जानेवारीला मतमोजणी होऊन नूतन अध्यक्षांच्या नावाची घोषणा केली जाईल. ४५ वर्षीय नितीन नवीन हे बिहारमधील बांकीपूरचे पाचवेळा आमदार राहिले असून, ते भाजपचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरू शकतात. जे.पी. नड्डा यांचा कार्यकाळ संपल्यानंतर १४ डिसेंबर रोजी त्यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती.

# ठाकरे बंधूंना बावनकुळेंचा जोरदार टोला

**मुंबई, ता. १६ :** देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे प्राथमिक कल हाती आले असून, भारतीय जनता पक्षाने जोरदार मुसंडी मारली आहे. समोर आलेल्या आकडेवारीनुसार, भाजपने १०० जागांचा टप्पा पार केला आहे. या जबरदस्त कामगिरीमुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे यांच्या युतीलाला मोठा धक्का बसल्याचे प्राथमिक कलांमधून दिसून येत आहे.



मुंबई महानगरपालिकेची ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाते. यावेळी मुंबईवर वर्चस्व मिळवण्यासाठी सर्वच पक्षांनी आपली पूर्ण ताकद पणाला लावली होती. प्रचारादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये एकमेकांवर गंभीर आरोप-प्रत्यारोप झाले, अनेक राजकीय नाट्यमय घडामोडी घडल्या. बहुतांशी महापालिकांवर भाजपचे वर्चस्व पहायला मिळत आहे. अशातच आता भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच्या या विजयावर आणि मुंबईतील ठाकरे बंधुंच्या पराभवावर भाष्य केले आहे. भाजपच्या विजयाबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले की, डबल इंजिन सरकार म्हणजे मोदीजींचं सरकार, देवेंद्रजींचे सरकारच महाराष्ट्राचा विकास करू शकते, विकसित महाराष्ट्र बनवू शकतं, ग्रामीण भागातूनही असाच निकाल मागच्या वेळी आला होता. मला असं वाटतं की हे मत विश्वासाचं मत आहे, विकासाचं मत आहे. सध्या हाती आलेला कल आता असाच सुरू राहील आणि महायुती दोन तृतियांश बहुमताने आणि ५१ टक्के नगरसेवकांसह भाजप विजय मिळवले असं मला वाटतं.

मुंबईत ठाकरेंना मतदारांनी का नाकारलं यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, या पराभवाचं एकच कारण आहे. या महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाचं व्हिजन, एकनाथ शिंदे आणि भाजपाची महायुती आणि डबल इंजिन सरकारवर सरकारने विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यांचा पराभव झाला.

दरम्यान या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युती केली होती. शरद पवारांची राष्ट्रवादीही त्यांच्यासोबत होती. मात्र या आघाडीला आता मुंबईकरांनी नाकारल्याचे समोर आले आहे.



## नाशिकमध्ये भाजपचा दणदणीत विजय; एक हाती सत्ता

**नाशिक, ता. १६ :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या नाशिक महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) दणदणीत विजय मिळवला आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत भाजपने स्वबळावर बहुमताचा जादुई आकडा ओलांडून नाशिकचा गड राखला आहे. नाशिक महापालिकेच्या एकूण १२२ जागांपैकी भाजपने ६६ जागांवर आघाडी घेत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. विजयासाठी आवश्यक असलेला ६२ हा जादुई आकडा भाजपने सहज पार केला आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली असून, ते दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आले आहेत. नाशिकमध्ये येत्या काळात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी भाजपने ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. विकासकामांच्या जोरावर मतदारांनी पुन्हा एकदा भाजपला कौल दिल्याचे चित्र आहे.

# शिरूरच्या उपनगराध्यक्षपदी मितेश गादिया; दोन्ही राष्ट्रवादी गटांची एकजूट, भाजप विरोधी बाकावर

योगेश मारणे

शिरूर, ता. १६ : शिरूर नगरपरिषद निवडणुकीदरम्यान परस्परांविरोधात लढलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हे दोन्ही गट अखेर उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी एकत्र आले. या नव्या राजकीय जुळवाजुळवीतून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे मितेश प्रदीप गादिया यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाली आहे.

शिरूर नगरपरिषदेच्या रसिकलाल धारीवाल सभागृहात पार पडलेल्या विशेष सभेत उपनगराध्यक्षपदासाठी मितेश गादिया आणि भाजपचे नितीन पाचर्णे यांच्यात थेट लढत झाली. या निवडणुकीत गादिया यांना १४ मते, तर पाचर्णे यांना ११ मते मिळाली. त्यामुळे गादिया विजयी झाले.




नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पहिल्याच सभेत नगरपरिषदेतील सत्तासमीकरणे स्पष्ट झाली. राज्य व केंद्रात सत्तेत असलेले भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) स्थानिक पातळीवर एकत्र येतील, अशी चर्चा होती. मात्र दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र आल्याने भाजपला विरोधी बाकावर बसावे लागले.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत भाजपने सर्वाधिक ११ नगरसेवक निवडून आणले होते. तरीही सत्तास्थापना राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे सात नगरसेवक असून, एका अपक्ष नगरसेविकेच्या पाठिंब्यामुळे त्यांचे संख्याबळ आठ झाले आहे. शरद पवार गटासह दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याने नगरपरिषदेत सत्ता स्थापन झाली. उपनगराध्यक्षपदी निवड झालेले मितेश गादिया हे प्रभाग क्रमांक आठचे नगरसेवक आहेत. निवडणुकीपूर्वी ते भाजपमध्ये होते; मात्र निवडणूक काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)मध्ये प्रवेश केला आणि ते निवडून आले.

दरम्यान, स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)कडून अभिजित पाचर्णे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)कडून अमोल चव्हाण, तर भाजपकडून राजेंद्र अरुण लोळगे यांची निवड करण्यात आली आहे. केंद्र व राज्यात एकत्र असलेले भाजपराष्ट्रवादी पक्ष शिरूरमध्ये मात्र परस्परांविरोधात उभे राहिल्याने स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारीला पुणेकरांचा नकार; आंदेकर विजयी, जयश्री मारणे व बापू नायर पराभूत

**पुणे, ता. १६ :** पुणे महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबियांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. आंदेकर, गजा मारणे आणि बापू नायर या कुख्यात गुंडांच्या कुटुंबियांना तिकीट दिल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही टीकेची झोड उठली होती. मात्र या तिघांपैकी केवळ आंदेकर यांनी आपले वर्चस्व राखत रविवार पेठनाना पेठ भागातून विजय मिळवला, तर जयश्री मारणे आणि बापू नायर यांचा पराभव झाला आहे.




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांना बावधन येथील प्रभाग क्रमांक १० मधून अधिकृत एबी फॉर्म देत उमेदवारी जाहीर केली होती. या निर्णयामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली होती. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना उमेदवारी देणे योग्य आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

जयश्री मारणे यांनी यापूर्वी २०१२ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तिकिटावर कोथरूडमधून निवडणूक लढवून विजय मिळवला होता. २०२२ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र त्यानंतर गजा मारणे याच्यावर गंभीर गुन्हे दाखल होऊन त्याला तुरुंगात टाकण्यात आले. अशा पार्श्वभूमीवर गुन्हेगारीमुक्त राजकारण आणि गुंडांना थारा नको अशी भूमिका मांडणाऱ्या अजित पवारांनीच गजा मारणेच्या पत्नीला उमेदवारी दिल्याने विरोधकांनी जोरदार टीका केली होती. दरम्यान, अखेर या टीकेला पुणेकरांनी मतदानातून उत्तर दिले. बावधन प्रभाग क्रमांक १० मधून जयश्री मारणे यांचा पराभव झाला, तर मोक्काअंतर्गत गुन्हे दाखल असलेल्या बापू नायर यांनाही मतदारांनी नाकारले. या निकालामुळे पुण्यात गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या राजकारणाला स्पष्ट नकार मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# दीपक मानकरांचे दोन्ही सुपुत्र विजयी; हर्षवर्धन राष्ट्रवादीकडून तर राघवेंद्र भाजपकडून विजयी

**पुणे, ता. १६ :** पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजप आणि शिंदेसेना स्वबळावर, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी आणि काँग्रेस, उद्धवसेना व मनसे हे एकत्रपणे निवडणुकीला सामोरे जात आहेत. अनेकजण राजकीय पक्ष बदलून निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये माजी नगरसेवक एकमेकांच्या विरोधात उभे राहिले आहेत. निवडणुकीत १६५ जागांसाठी १ हजार १५५ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात अपक्ष उमेदवारांची संख्या २७७ आहे. प्रभाग क्रमांक मधील भाजपच्या मंजुषा नागपुरे आणि श्रीकांत जगताप यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता निवडणूक १६३ जागांसाठी होत आहे.



पुण्याच्या निवडणुकीत दीपक मानकरांच्या दोन्ही मुलांनी लक्ष वेधले असून दोघे भाऊ असून ते वेगवेगळ्या पक्षातून निवडणूक लढवत होते. दीपक मानकर यांचे पुत्र हर्षवर्धन मानकर हे प्रभाग क्रमांक ११ मधून अजित पवारांच्या राष्ट्रवादी मधून निवडणूक लढवत होते. तर दीपक मानकर यांचे दुसरे पुत्र राघवेंद्र मानकर हे प्रभाग क्रमांक २५ मधून भाजपमधून निवडणूक लढवत होते. अखेर या दोघांचा विजय झाला आहे. प्रभाग २५ मधून भाजपचे राघवेंद्र मानकर, स्वप्नाली पंडित, स्वरदा बापट, कुणाल टिळक हे विजयी झाले आहेत. तर प्रभाग क्र ११ मधून राष्ट्रवादीचे हर्षवर्धन मानकर, काँग्रेसच्या दिपाली ढोक, भाजपच्या मनिषा बुटाला आणि काँग्रेसचे रामचंद्र कदम हे विजयी घोषित झाले आहेत.

पुण्यात भाजपने चांगलीच मुसंडी मारली असून जवळपास ९० च्या आसपास जागांवर आघाडी घेतली आहे. तर ६० पेक्षा जास्त नगरसेवक आतापर्यंत निवडून आले आहेत. मात्र या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असूनही जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी अपयशी ठरल्या आहेत. पिंपरीतही भाजपची सत्ता मिळवण्याच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. पुण्यात राष्ट्रवादीचे १० उमेदवार सध्या आघाडीवर असून ४ नगरसेवक निवडून आले आहेत. अनेकजण राजकीय पक्ष बदलून निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये माजी नगरसेवक एकमेकांच्या विरोधात उभे राहिले आहेत. भाजप , शिंदेसेना, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आणि काँग्रेस-उद्धवसेना-मनसे या चौरंगी लढत सर्वत्र सुरु आहे.

# अखेर डोनाल्ड ट्रम्प यांचं स्वप्न पूर्ण; व्हेनेझुएला ताब्यात घेतल्यानंतर मिळालं शांततेचं नोबेल मेडल

**वॉशिंग्टन, ता. १६ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी (स्थानिक वेळेनुसार) व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या आणि नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या मारिया कोरिना मचाडो यांनी आपला नोबेल पुरस्कार त्यांना अर्पण केल्याबद्दल आभार मानले. हा प्रसंग परस्पर आदराचे अद्भुत प्रदर्शन असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

व्हाईट हाऊसमध्ये झालेली ट्रम्प आणि मचाडो यांची भेट महत्त्वाची मानली जात असून, अमेरिकेने व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना ताब्यात घेतल्यानंतर देशाच्या राजकीय भवितव्याविषयी सुरू असलेल्या चर्चांवर या भेटीचा परिणाम होऊ शकतो. वॉशिंग्टनमध्ये पत्रकारांशी बोलताना मचाडो यांनी ट्रम्प यांना नोबेल शांतता पुरस्काराचे पदक दिल्याचे मान्य केले. मात्र, ट्रम्प यांनी ते औपचारिकरित्या स्वीकारले की नाही, याबाबत त्यांनी स्पष्ट उत्तर दिले नाही.

या भेटीनंतर ट्रम्प यांनी आपल्या ट्रुथ सोशल या समाज माध्यमावर पोस्ट करत म्हटले, आज व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना भेटणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान होता. त्या एक अद्भुत महिला आहेत आणि त्यांनी खूप काही सहन केले आहे. त्यांनी माझ्या कार्याची दखल घेत मला त्यांचा नोबेल शांतता पुरस्कार अर्पण केला. हा परस्पर आदराचा सुंदर क्षण आहे.

गुरुवारी सकाळी मचाडो पांढऱ्या सूटमध्ये एसयूव्ही वाहनातून व्हाईट हाऊस संकुलात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांची ट्रम्प यांच्याशी बंद दाराआड चर्चा झाली. निरीक्षकांच्या मते, दोघांमधील




ही उच्चस्तरीय बैठक दुर्मिळ असून, व्हेनेझुएलाच्या भविष्यातील राजकीय दिशेला आकार देण्याच्या प्रयत्नांचा तो भाग असू शकतो. दरम्यान, नोबेल समितीने पुरस्काराच्या नियमांबाबत आपली भूमिका पुन्हा स्पष्ट केली आहे. एकदा जाहीर झालेला नोबेल पुरस्कार रद्द, हस्तांतरित किंवा सामायिक करता येत नाही, असे समितीने नमूद केले. नोबेल पीस सेंटरने सांगितले की, पदकाचा मालक बदलू शकतो, मात्र नोबेल शांतता पुरस्कार विजेत्याची ओळख बदलत नाही. नोबेल फाउंडेशनच्या कायद्यानुसार, पुरस्कार देण्याच्या निर्णयाविरोधात कोणतेही अपील करता येत नाही आणि आजवर कोणताही नोबेल पुरस्कार मागे घेतलेला नाही.

ट्रम्प यांनी यापूर्वी अनेकदा आपण युद्धे थांबवण्यात निर्णायक भूमिका बजावल्याचा दावा करत नोबेल शांतता पुरस्कार मिळावा, अशी इच्छा जाहीरपणे व्यक्त केली होती. आपल्या दुसऱ्या कार्यकाळात त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय संघर्षांवर तोडगा काढल्याचाही दावा केला आहे. मारिया कोरिना मचाडो यांना ऑक्टोबर २०२५ मध्ये व्हेनेझुएलामधील लोकशाही चळवळीचे नेतृत्व आणि निकोलस मादुरो सरकारविरोधातील संघर्षासाठी नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या वृत्तानुसार, पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सुरुवातीला ट्रम्प मचाडो यांना पाठिंबा देण्याबाबत साशंक होते आणि हा सन्मान आपल्यालाच मिळायला हवा होता, असे त्यांना वाटत होते.